मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# नागरी सहभाग अंदाजपत्रकासाठी पाचशेहून अधिक सूचना

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या उपक्रमाला नागरिकांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे : रस्ते, सांडपाणी, आरोग्य, उद्याने, क्रीडांगणे आणि इतर सुविधांबाबत कामांचा समावेश करण्याच्या सूचना**

**पिंपरी | प्रतिनिधी**

अंदाजपत्रकात नागरी सहभाग या महापालिकेच्या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत शहरातील विविध भागांतून नागरिकांनी रस्ते, सांडपाणी, आरोग्य, उद्याने, क्रीडांगणे आणि इतर सुविधांबाबत पाचशेपेक्षा जास्त कामांचा समावेश करण्याच्या सूचना केल्या आहेत.

अंदाजपत्रकात नागरी सहभाग या महापालिकेच्या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत शहरातील विविध भागांतून नागरिकांनी रस्ते, सांडपाणी, आरोग्य, उद्याने, क्रीडांगणे आणि इतर सुविधांबाबत पाचशेपेक्षा जास्त कामांचा समावेश करण्याच्या सूचना केल्या आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरातील विविध उपाययोजना, उपक्रम, प्रकल्प यामध्ये नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या माध्यमातून महापालिकेने नागरिकांच्या मागणीनुसार महापालिका हद्दीतील विकासकामे करण्यासाठी मदत होणार आहे. यामध्ये पीसीएमसी स्मार्ट सारथी या मोबाईल ॲपच्या माध्यमातून नागरिक त्यांच्या अपेक्षा, सूचना, कल्पना ऑनलाईन पद्धतीने नोंदवत आहेत. त्यासाठी वृत्तपत्रे, रेडिओ, व्हीएमडी, सोशल मीडिया व चित्ररथाच्या साहाय्याने जनजागरण मोहीम सुरू आहे. अनेक नागरिकांना या चित्ररथामुळे मागील कल्पना आणि उद्दिष्ट समजावून सांगण्यास मदत होत आहे. तसेच चित्ररथावरील क्यूआर कोडच्या माध्यमातून अनेकांनी आतापर्यंत या मोहिमेत सहभागी होऊन त्यांच्या परिसरातील पायाभूत सुविधांबाबतच्या मागण्या, अभिप्राय नोंदवले आहेत.

आतापर्यंत पाचशेपेक्षा अधिक नागरिकांनी विविध प्रकारच्या कामांचा समावेश करण्याच्या सूचना केल्या आहेत. ही कामे आगामी अर्थसंकल्पात घेतली जाणार असून त्यासाठी आवश्यक तरतूद केली जाईल, असे महापालिकेच्या वतीने लेखा विभागातील अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. नागरिकांनी नोंदवलेल्या अडचणी, समस्या किंवा मागण्यांचा विचार नवीन वर्षाच्या अंदाजपत्रकात करण्यात येणार आहे. तरी स्मार्ट सारथी ॲपच्या माध्यमातून नागरिकांनी स्वतःची प्राथमिक माहिती भरून अर्ज करावेत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



### विकासासाठी नागरिकांचा अभिप्राय महत्वाचा

» पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी नागरिकांनीही त्यांच्या परिसरातील पायाभूत सोयीसुविधांबाबत मागण्या आणि सूचना देणे गरजेचे आहे. प्रत्येक नागरिकाची सूचना महत्त्वाची असून नागरी परिसराचा विकास साधण्यासाठी महापालिकेस यामुळे मदत होणार आहे. तसेच चालू वर्षात नागरिकांनी नोंदवलेल्या अडचणी, समस्या किंवा मागण्यांचा विचार नवीन वर्षाच्या अंदाजपत्रकात (२०२५-२६) करण्यात येणार आहे. तरी स्मार्ट सारथी ॲपच्या माध्यमातून नागरिकांनी स्वतःची प्राथमिक माहिती भरून अर्ज करावेत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### कामे सुचवण्यासाठी 10 सप्टेंबरपर्यंत मुदत

» शहरातील नागरिक महापालिकेचे अधिकृत संकेतस्थळ, स्मार्ट सारथी ॲप, तसेच https://fxurl.co/9kiz9 या वेबलिंकद्वारे किंवा बारकोडद्वारे प्राथमिक माहिती भरून ऑनलाईन पद्धतीने घरबसल्या अर्ज करू शकतात. ही कामे सुचविण्यासाठी नागरिकांना १० सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी केले आहे.

# आंद्रा पाणी योजनेच्या डीपीआरसाठी गवसला मुहूर्त सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास सुरुवात

**प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून डीआरए कन्सल्टंटस लि. एजन्सी नियुक्त करण्यात आली त्या सल्लागाराचे एकूण शुल्क सहा कोटी रुपये द्यावे लागणार आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेकडून आंद्रा पाणी योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून डीआरए कन्सल्टंटस लि. एजन्सी नियुक्त करण्यात आली आहे. त्या सल्लागाराचे एकूण शुल्क सहा कोटी रुपये द्यावे लागणार आहे.

मावळ तालुक्यातील आंद्रा धरणातून महापालिकेस १०० एमएलडी आणि खेड तालुक्यातील भामा-आसखेड धरणातून १६७ एमएलडी पाणी आरक्षित आहे. पाणी आरक्षणास राज्य शासनाने २४ ऑक्टोबर २०१८ ला नव्याने मंजुरी दिली. त्या बदल्यात महापालिका दरवर्षी कोट्यवधी रुपयांचे शुल्क जलसंपदा विभागाकडे भरत आहे.

भामा-आसखेड धरणातून पाणी आणण्यासाठी महापालिकेने भूमिगत जलवाहिनी टाकणे, धरणाजवळ जॅकवेल व पंम्पिग स्टेशन उभारणे आदी कामे सुरू आहेत. नवलाख उंब्रे येथे ब्रेक प्रेशर टँकचे काम केले जात आहे. या प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ४० टक्के काम झाले आहे. वर्षभरात उर्वरित काम करण्याचे नियोजन आहे. जागा ताब्यात येण्यास विलंब होत असल्याने जलवाहिनीच्या कामास अधिक वेळ जात आहे.

सद्यस्थितीत आंद्रा धरणातून शहराला ९० एमएलडी पाणी मिळत आहे. हे पाणी धरणातून इंद्रायणी नदीत सोडले जाते.



### आंद्राच्या पाण्याने अनेक गावांची तहान भागणार

» पिंपरी-चिंचवड शहरासाठी आंद्रा धरणातून शंभर एमएलडी पाणी घेतले जाणार आहे. जलसंपदा विभागाने शहरासाठी प्रतिदिन १०० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी कोटा मंजूर केला आहे. त्यापैकी सध्यस्थितीत दररोज ८० ते ९० एमएलडी पाणी उचलले जात आहे. हे पाणी चिखली जलशुध्दीकरण केंद्रात आणून प्रक्रिया केल्यानंतर पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे चिखली सह तळवडे, मोशी, डुडुळगाव, चऱ्होली, वडमुखवाडी, चोविसावाडी, दिघी, बोपखेल, भोसरीचा काही भाग, मोशी प्राधिकरण आदी भागात पाणीपुरवठा केला जात आहे.

# अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराला लागला चाप

**महापालिकेच्या आरोग्य विभागात सुरू असलेल्या मनमानीला अखेर महापालिका आयुक्त आणि नव्याने नियुक्त झालेले आरोग्य प्रमुखांनी चाप लावला आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या आरोग्य विभागात सुरू असलेल्या मनमानीला अखेर महापालिका आयुक्त आणि नव्याने नियुक्त झालेले आरोग्य प्रमुखांनी चाप लावला आहे. एकाच अधिकाऱ्याकडे दहा-दहा वर्षांपासून असलेल्या विभागांचा कार्यभार अखेर काढून घेण्यात आला आहे.

नव्या आरोग्यप्रमुखांनी केलेल्या या 'खांदेपालटा'मुळे आता आरोग्य विभागाचा कारभार सुरळीत होईल, असा विश्वास वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्त केला असून स्वतःच आरोग्यप्रमुख समजून सह्या करून बिले मंजूर करून घेण्याचा प्रकारही बंद होणार असल्याचा विश्वास महापालिकेतील आरोग्य विभागातील घटकांनी व्यक्त केला आहे.

मागच्या आरोग्य प्रमुखांचा विषयही चांगलाच गाजला होता. त्यानंतर आम आदमी पक्षाने आरोग्य अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला असल्याचा आरोप केला होता. याची दखल घेत प्रभारी आरोग्य प्रमुखांनी संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी लावली आहे. एकूण दहा दहा वर्षांपासून एकाच विभागाचा कार्यभार असल्याने अधिकाऱ्यांकडून मनमानी कारभार सुरू होता. याचा त्रास प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनादेखील होत होता. तसेच अधिकारी अनेक वर्षांपासून काम करत असल्याने प्रत्येकाला आरोग्यप्रमुख होण्याची मनीषा आहे. त्यामुळे एकमेकांवर सातत्याने आरोप प्रत्यारोप होत आहेत. एकदा तर दोन अधिकाऱ्यांचा वाद थेट अतिरिक्त आयुक्तांसमोरच झाल्याचा प्रकार घडल्याची चांगलीच चर्चा रंगली होती. आता विभाग बदलल्यामुळे कामात सुसूत्रता येईल, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

साहाय्यक आरोग्य अधिकारी मनीषा नाईक यांच्याकडील शहरी गरीब योजना, विकेंद्रित परवाना, नर्सिंग होम रजिस्ट्रेशन, खासगी दवाखाना नियमन व नियंत्रण आदी विभाग काढून त्यांच्याकडे राष्ट्रीय आरोग्य अभियान, सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम अंमलबजावणी, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग आणि परिमंडळ दोन सनियंत्रण व पर्यवेक्षण अधिकारी ही जबाबदारी दिली आहे. उप आरोग्य अधिकारी कल्पना बळीवंत यांच्याकडे आता मेडिकल युनिट व आरोग्य विभागाकडील सामान्य प्रशासन, पीसीपीएनडीटी व एमटीपी ॲक्ट कामकाज, मेडिकल कॉलेज व्यवस्थापन, १ ते ३ लाखापर्यंतची वैद्यकीय बिलांची देयके मान्यतेची जबाबदारी दिली आहे.

डॉ. वैशाली जाधव यांच्याकडे साथरोग नियंत्रण कार्यक्रम, जिल्हा नियोजन समितीमार्फत करावयाची कामे, महापौर निधी, राष्ट्रीय असंसर्गजन्य आजार कार्यक्रम, परिमंडळ क्रमांक ४ सनियंत्रण व पर्यवेक्षण अधिकारी, तर डॉ. संजीव वावरे यांच्याकडे औषध भांडार, पालिका रुग्णालयांची सुधारणा व आधुनिकीकरण, आरोग्य प्रकल्प, अंशदायी वैद्यकीय साहाय्यक योजना, शहरी गरीब योजना अशी जबाबदारी दिली आहे.



### काही अधिकाऱ्यांच्या आर्थिक गैरव्यवहाराच्या तक्रारी

» महापालिकेच्या आरोग्य विभागात सहा साहाय्यक आरोग्य अधिकारी कार्यरत आहेत. यातील काही अधिकाऱ्यांकडे अनेक विभागातील जबाबदारी आहे. तर दुसरीकडे काही अधिकारी केवळ नावापुरतेच होते. यातील काही साहाय्यक आरोग्य अधिकाऱ्यांकडे अनेक वर्षांपासून मलईचे विभाग होते. त्यामुळे या विभागांमध्ये काम करणारे इतर कर्मचारीही वर्षानुवर्षे एकाच टेबलवर होते. त्यामुळे साहाय्यक आरोग्य अधिकाऱ्यांची त्या त्या विभागात एकाधिकारशाही निर्माण झाली होती. काही अधिकारी तर विभागप्रमुख म्हणून बिलांवर स्वतःच सह्या करत होते. विशेष म्हणजे, रजेवर जाताना साहाय्यक आरोग्य अधिकारी आपल्याकडील पदभार दुसऱ्याकडे न सोपवता स्वतःकडेच ठेवत असल्याची अनेक उदाहरणे समोर आली होती. काही अधिकाऱ्यांच्या आर्थिक गैरव्यवहाराच्या तक्रारी महापालिकेच्या अतिवरिष्ठ अधिकाऱ्यांकडे आल्या होत्या. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांचे विभाग बदलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### मलईदार विभागासाठी फिल्डिंग...

» आरोग्य विभागातील मलईचा विभाग मिळावा, यासाठी काही अधिकाऱ्यांनी राज्यातील बड्या राजकीय नेत्यांकडे फिल्डिंग लावण्याचे काम केले जाते. एकाच अधिकाऱ्याकडे वर्षानुवर्षे तेच ते विभाग राहिल्याने एकाधिकारशाही निर्माण झाली होती. संबंधित अधिकाऱ्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप झाल्यानंतर यापूर्वीही जबाबदाऱ्यांमध्ये बदल करण्यात आले. मात्र, काही दिवसातच वजनदार नेत्यांकडे फिल्डिंग लागून संबंधितांनी पुन्हा मलईदार विभाग स्वतःकडे खेचून घेतले. त्यानंतर आता झालेले बदल हेच राहतील का की पुन्हा राजकीय फिल्डिंग लावून विभाग पळवले जातील. याकडे लक्ष लागून राहिले आहे.

# गणेशोत्सव मंडळांमध्ये महिलांचा सहभाग वाढवा : मंत्री चंद्रकांत पाटील

**गणेशोत्सव हा आनंदाचा क्षण आणि उत्साहाचा सण आहे. त्यामुळे सर्वांनी एकत्रितपणे सर्वांना सोबत घेऊन शांततेत आणि मोठ्या आनंदाने साजरा करावा, असे आवाहन केले**

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सव हा आनंदाचा क्षण आणि उत्साहाचा सण आहे. त्यामुळे सर्वांनी एकत्रितपणे सर्वांना सोबत घेऊन शांततेत आणि मोठ्या आनंदाने साजरा करावा, असे आवाहन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. गणेश मंडळांमध्ये आणि उत्सवाच्या नियोजनामध्ये महिलांचा सहभाग वाढला पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

कोथरुड, अलंकार आणि वारजे हद्दीतील गणेश मंडळांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी पश्चिम प्रादेशिक विभागाचे अप्पर पोलीस आयुक्त प्रवीण पाटील, पोलीस उपायुक्त संभाजी कदम, उपायुक्त जी. श्रीधर यांच्यासह गणेश मंडळांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

गणेशोत्सव मंडळांना मार्गदर्शन करताना मंत्री पाटील म्हणाले, आपल्या देशाची मोठी ताकद आपत्तीच्या काळात समाज संघटित होऊन सर्वांना मदत करण्यामध्ये आहे. कोविड काळात गणेशोत्सव मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करत केलेले सेवा कार्य अतिशय कौतुकास्पद होते. त्यामुळे एवढी मोठी लोकसंख्या असूनही आपण कोविडवर यशस्वीपणे मात करू शकलो.

ते पुढे म्हणाले, महिला आज प्रत्येक क्षेत्रात पुढे आहेत. राजकारणातही त्यांचा सहभाग वाढवा यासाठी 33 टक्के आरक्षण मिळाले आहे. त्यामुळे आगामी काळात महिला मोठ्या प्रमाणात लोकप्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यामुळे गणेशोत्सव मंडळांमध्ये आणि उत्सवाच्या नियोजनामध्ये महिलांचा सहभाग वाढणे ही काळाजी गरज आहे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

उत्सव काळात अनुचित प्रकार टाळण्यासाठी मंडळांनी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करावेत, त्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल. त्यासोबतच मंडळांनी समाजप्रबोधनाचे कार्यक्रम आयोजित करावेत, अशी सूचना श्री. पाटील यांनी केली. तसेच, गणेश मंडळांनी मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांनाच प्राधान्य द्यावे असेही आवाहनही त्यांनी केले.




### सहकार्य प्रशासनाच्यावतीने होईल

» अप्पर पोलीस आयुक्त पाटील म्हणाले, आपल्याकडे गणेशोत्सव मंडळ ही मोठी शक्ती आहे, तिचा उपयोग समाजाच्या विकासासाठी आणि गरजूंना मदतीसाठी झाला पाहिजे. आगामी काळात गणेशोत्सव साजरा होत असताना मंडळांना आवश्यक ते सर्व सहकार्य प्रशासनाच्यावतीने होईल. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आपण सर्व एकत्रितपणे काम करू आणि हा उत्सव शांततेत आणि मोठ्या उत्साहात साजरा करुया, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

### प्लाझ्मा आणि लेझरचा वापर टाळावा

» बैठकीच्या सुरुवातीला उपायुक्त संभाजी कदम यांनी तीनही विभागात एकूण 278 गणेश मंडळे असल्याचे सांगितले. गणेशोत्सव मंडळांनी सामाजिक बांधिलकी राखून पर्यावरण आणि आरोग्यवर्धक गणेशोत्सव साजरा करावा. तसेच, मंडळांनी मिरवणुकीत प्लाझ्मा आणि लेझरचा वापर टाळावा असे आवाहन त्यांनी केले.

# शालेय साहित्य खरेदी प्रक्रियेत अनागोंदी

## ठेकेदारांचे शालेय साहित्य शासकीय लॅबनुसार निकृष्ट असताना महापालिकेच्या अधिकारी पुनर्तपासणी करून साहित्याचे वाटप करत आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

ठेकेदारांचे शालेय साहित्य शासकीय लॅबनुसार निकृष्ट असताना महापालिकेच्या अधिकारी पुनर्तपासणी करून साहित्याचे वाटप करत आहेत. त्यामुळे महापालिकेचे सुमारे २० कोटींचे नुकसान झाले आहे.

ठेकेदारांचे शालेय साहित्य शासकीय लॅबनुसार निकृष्ट असताना महापालिकेच्या अधिकारी पुनर्तपासणी करून साहित्याचे वाटप करत आहेत. त्यामुळे महापालिकेचे सुमारे २० कोटींचे नुकसान झाले आहे. या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनागोंदी झाल्याचा गंभीर आरोप भाजप युवा मोर्चाचे शहराध्यक्ष तुषार हिंगे यांनी केला आहे. तसेच, अधिकारी व ठेकेदारांची चौकशी करून कारवाईची मागणी त्यांनी केली आहे.

याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री अजित पवार, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्यासह पंतप्रधान कार्यालयाकडे तक्रार केली आहे. त्यांनी केलेल्या तक्रारीत म्हटले आहे, महापालिकेने डीबीटीअंतर्गत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यावर शालेय साहित्याचे गतवर्षी पैसे दिले होते. परंतु, या वर्षी पुन्हा ठेकेदारांमार्फत शालेय साहित्य पुरवण्याचा घाट घालण्यात आला.

तेव्हापासून ही प्रक्रिया वादात आहे. त्यातच सत्ताधारी भाजप पदाधिकाऱ्यांकडूनच या प्रक्रियेवर आरोप होत आहेत. महापालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये ४२ हजार, माध्यमिक शाळांमध्ये ९ हजार, असे पहिली ते दहावी एकूण ५१ हजार विद्यार्थ्यांना 'डीबीटी'द्वारे थेट शालेय साहित्य खरेदीसाठी रोख रक्कम देणे अपेक्षित आहे. मात्र, थेट विद्यार्थ्यांच्या खात्यावर पैसे दिले जात नसल्याने ठेकेदार व अधिकाऱ्यांचा स्वार्थ साधला गेला आहे.

त्यामुळे ठेकेदारांमार्फत साहित्य पुरवले जात आहे. त्यासाठी प्रक्रिया राबवताना दहा ठेकेदारांनी दिलेले शालेय साहित्याचे नमुने शासकीय प्रयोगशाळेने अयोग्य ठरवले होते. तसे असताना संबंधित अधिकाऱ्यांनी त्याच ठेकेदारांचे साहित्य इतर प्रयोगशाळेत पाठवून योग्य असल्याचे प्रमाणपत्र घेतले. ही अनागोंदी झाली असून निकृष्ट साहित्य विद्यार्थ्यांना दिले जात आहे.

शिक्षण विभागाने चुकीची प्रक्रिया राबवून पुरवठादारांना सोयीस्कर भुमिका घेवून विद्यार्थ्यांच्या माथी निकृष्ट साहित्य मारण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. या प्रकरणात संबधित अधिकारी, कर्मचारी यांची चौकशी व्हावी, तसेच पहिल्या तपासणीत ज्या ठेकेदारांचे साहित्य अयोग्य ठरले. त्यांच्यावर तातडीने काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करावी. केंद्र सरकारने खरेदीतील भ्रष्टाचार आणि ठेकेदारांची रिंग तोडण्यासाठी डीबीटी प्रक्रिया २०१३ मध्ये अमलात आणली. राज्य सरकारने ही योजना राबवण्याचा निर्णय ५ डिसेंबर २०१६ रोजी घेतला. तसा शासन निर्णय आहे. परंतु, त्याकडे दुर्लक्ष करून जुन्याच ठेकेदारांचे हीत जोपासण्यासाठी अधिकारी साहित्य खरेदीवर भर देत आहेत. दरम्यान, यात डीबीटी योजना न राबवता शालेय शिक्षण विभागाला साहित्य पुरवठा करणाऱ्या जुन्या ठेकेदारांकडून साहित्य घेतले आहे. यामुळे सुमारे २० कोटींचा चुराडा झाला आहे. याची गंभीर दखल घेऊन संबंधितांची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करा, अशी मागणी हिंगे यांनी केली आहे.



### महापालिकेचे सुमारे 20 कोटींचे नुकसान

» केंद्र सरकारने खरेदीतील भ्रष्टाचार आणि ठेकेदारांची रिंग तोडण्यासाठी डीबीटी प्रक्रिया २०१३ मध्ये अमलात आणली. राज्य सरकारने ही योजना राबवण्याचा निर्णय ५ डिसेंबर २०१६ रोजी घेतला. तसा शासन निर्णय आहे. परंतु, त्याकडे दुर्लक्ष करून जुन्याच ठेकेदारांचे हीत जोपासण्यासाठी अधिकारी साहित्य खरेदीवर भर देत आहेत. दरम्यान, यात डीबीटी योजना न राबवता शालेय शिक्षण विभागाला साहित्य पुरवठा करणाऱ्या जुन्या ठेकेदारांकडून साहित्य घेतले आहे. यामुळे सुमारे २० कोटींचा चुराडा झाला आहे.

### पीएमओसह, ईडी, एसीबीलाही निवेदन

» या प्रकरणी भाजप युवा मोर्चा शहराध्यक्ष हिंगे यांनी राज्य सरकारसह पंतप्रधान कार्यालय, केंद्रीय अन्वेषण विभाग, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सक्तवसुली संचालनालय यांच्याकडेही तक्रार केली आहे. कोट्यवधींच्या साहित्य खरेदी व निकृष्ट साहित्य वाटपाच्या सत्ताधारी पक्षाच्याच तक्रारीमुळे या प्रकरणी चौकशी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# रेशन कार्यालयात नाव वाढविण्यासाठी गर्दी लाडकी बहिण योजनेमुळे अर्जसंख्येत वाढ, कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण

## शिधापत्रिका कार्यालयात नाव वाढविण्यासाठी दिवसाकाठी 30 अर्ज वाढले आहेत, त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कामकाजावरही ताण येत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

लाडकी बहिण योजनेसाठी अर्ज भरणाऱ्यांबरोबर शिधापत्रिका कार्यालयात नाव वाढविणाऱ्यांची संख्या देखील वाढत आहे. त्यामुळे नागरिकांची गर्दी वाढली आहे. शिधापत्रिका कार्यालयात नाव वाढविण्यासाठी दिवसाकाठी ३० अर्ज वाढले आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कामकाजावरही ताण येत आहे.

शिधापत्रिका कार्यालयात नवीन शिधापत्रिका काढणे, नाव वाढविणे, दुबार शिधापत्रिका काढणे आदीसह विविध कामकाज केले जातात. शहरात सध्या तीनही कार्यालयांतर्गत साडे तीन लाख शिधापत्रिकाधारक आहेत. शहरात तीन कार्यालयांतर्गत शिधापत्रिकेची कामे चालत आहेत. या कार्यालयांतर्गतचा कारभार ११ कर्मचाऱ्यांवर होत आहे. तीन कार्यालयांतर्गत मंजूर पदांपैकी सात पदे रिक्त आहेत. कर्मचारी कमी असल्याने शिधापत्रिका कार्यालयात येणाऱ्या नागरिकांच्या कामांना गती मिळत नसल्याचे चित्र आहे. कामे रखडत असल्याने नागरिकांना हेलपाटे मारावे लागत आहे. त्यामध्येच आता लाडकी बहिण योजनेमुळे कामकाज संथगतीने होत आहे.

लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळविण्यासाठी शिधापत्रिकेत नावे नसणाऱ्यांनी नावे समाविष्ट करण्यासाठी धावपळ सुरू केली आहे. ही योजना जाहीर होण्यापूर्वी नाव वाढविण्यासाठी दिवसाकाठी चार अर्ज प्राप्त होत होते. लाडकी बहिण योजना जाहीर झाल्यानंतर नावे वाढविणाऱ्यांच्या अर्जात वाढ झाली आहे. सध्या एका कार्यालयात दिवसाकाठी दहा असे तीन कार्यालयांतर्गत सुमारे ३० अर्जांची संख्या वाढली असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. कर्मचारी संख्या कमी असल्याने त्याचा कर्मचाऱ्यांवर ताण येत आहे.



### ही कागदपत्रे आवश्यक

» विहित नमुन्यातील अर्ज किंवा सेतुमार्फत विहित नमुन्यात साक्षांकित कागदपत्रांसह नाव कमी करून मिळणेबाबत अथवा कार्ड रद्द करून मिळणेबाबत अर्ज. मूळ शिधापत्रिका. कुटुंब प्रमुखाचे घोषणापत्र. सर्व सदस्यांचे आधारकार्ड

> “लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळविण्यासाठी शिधापत्रिका कार्यालयात नाव समाविष्ट करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यासाठी रोजचे अर्ज वाढले आहेत. त्यामुळे धान्य वाटप व इतर दैनंदिन कामावर ताण येत आहे.
>
> \- दिनेश तावरे, जिल्हा पुरवठा अधिकारी, प्रभारी.

# आरोग्य विभागातील डॉक्टर म्हणतात, खासगी प्रॅक्टिसशी संबंध नाही!

## खुलासा समाधानकारक नसल्याने आरोग्य विभागाने संबंधित डॉक्टरांवर कारवाई करण्याचा प्रस्ताव महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील खासगी प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरांनी चक्क आपण खासगी प्रॅक्टिस करीत नसल्याचा खुलासा केला आहे. हा खुलासा समाधानकारक नसल्याने आरोग्य विभागाने संबंधित डॉक्टरांवर कारवाई करण्याचा प्रस्ताव महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविला आहे.

त्यामुळे 'एनपीए ' घेऊन खासगी प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरांवर सामान्य प्रशासन विभाग काय कारवाई याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आरोग्य विभागातील डॉक्टर नॉन प्रॅक्टिस अलाऊन्स ( एनपीए) अर्थात पगाराच्या ३५ टक्के अतिरिक्त रक्कम घेतात. त्यामुळे त्यांनी खासगी रुग्णालयात किंवा स्वत:चे रुग्णालय थाटून प्रॅक्टिस करता येत नाही. मात्र, काही डॉक्टर कोंढवा, चंदननगर, चाकण, किवळे येथे खासगी प्रॅक्टिस करीत असल्याचे आढळले होते. या डॉक्टरांच्या सोशल मीडिया व गुगल मॅपवर क्लिनिक, कार्याचा लेखाजोखा टाकला आहे. आरोग्य विभागाने अशा डॉक्टरांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. यावर डॉक्टरांनी आपण खासगी प्रॅक्टिस करीत नसल्याचा खुलासा केला. याचे समाधान न झाल्याने आरोग्य विभागाने त्यांच्या कारवाईचा प्रस्ताव महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविला आहे.

महापालिकेच्या आरोग्य विभागात स्त्रीरोग, बालरोग, भूलतज्ज्ञांसह सर्जन, प्लॅस्टिक सर्जरी करणारे वर्ग १ तज्ज्ञ वीस ते पंचवीस डॉक्टर, वर्ग -२ मधील दीडशे डॉक्टर सेवेत आहेत. तज्ज्ञ डॉक्टरांना दरमहा दीड लाखापेक्षा अधिक पगार आहे. यामध्ये त्यांच्या पगाराच्या ३५ टक्के अतिरिक्त रक्कम 'नॉन प्रॅक्टिस अलाऊन्स' ( एनपीए) म्हणून दिले जाते. मात्र, अनेक डॉक्टर शहरातील मोठ्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा बजावत आहेत. काही डॉक्टरांनी आपली स्वत:ची रुग्णालये थाटली आहेत. त्यांची प्रसिध्दीसुद्धा त्यांनी समाजमाध्यमांवर केली आहे. महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात कार्यरत असलेले एक डॉक्टर इंदिरा आयव्हीएफ केंद्रात कार्यरत आहेत. याच रुग्णालयात नोकरी करणारे अस्थिरोग तज्ज्ञ चाकण येथील सूर्या मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये सेवा बजावत आहेत. कमला नेहरू रुग्णालयातील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टरांचे कोंढवा येथे क्लिनिक आहे. क्लिनिकमध्ये त्या रुग्णांना सशुल्क सेवा देतात.




### आरोग्य विभागाचे कारणे दाखवा नोटीस

» कमला नेहरू रुग्णालयातील एक प्लॅस्टिक सर्जन पिंपरी चिंचवड हद्दीत किवळे येथे सार्थक मॅटर्निटी व प्लॅस्टिक सर्जन क्लिनिक चालवत आहेत. वडगाव शेरी येथील महापालिकेच्या दवाखान्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांचे चंदननगर येथे स्वत:चे क्लिनिक आहे या डॉक्टरांना महापालिकेच्या आरोग्य विभागाने कारणे दाखवा नोटीस दिली होती. मात्र, वरील सर्व डॉक्टरांनी आपण खासगी प्रॅक्टिस करीत नसल्याचे लेखी उत्तर दिले आहे. याचे समाधान न झाल्याने आरोग्य विभागाने त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविले आहे..

### स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र

» पुणे महापालिकेचा आरोग्य विभाग दर तीन महिन्यांनी डॉक्टरांकडून खासगी व्यवसाय करीत नसल्याचे शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र लिहून घेतो. यामध्ये विशेषतज्ज्ञ, परिमंडळ व क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी, फिजिओथेरपिस्ट, दंतवैद्य यांच्याकडून प्रतिज्ञापत्र लिहून घेतले जाते. तरीही काही डॉक्टर खासगी प्रॅक्टिस करीत असल्याचे दिसून आले आहे. आता यांच्यावर महापालिका सामान्य प्रशासन विभाग काय कारवाई करणार याची उत्सुकता महापालिकेतील डॉक्टरांनाच लागली आहे.

# रस्त्यावर कचरा टाकणा-यांनो सावधान,आळेखिंडीत कचरा टाकल्यास कडक कारवाई

## आळेखिंडीत जे नागरीक कचरा टाकत आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रातांधिकारी गोविंद शिंदे यांनी दिली.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-नाशिक या राष्ट्रीय महामार्गावर आळेखिंडीत जे नागरीक कचरा टाकत आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रातांधिकारी गोविंद शिंदे यांनी दिली.

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या आळेखिंड येथे संतवाडी (ता. जुन्नर) गावाच्या रस्त्याच्याकडेला बेजवाबदार नागरिक मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक पिशव्यासह घनकचरा टाकत असल्याने दुर्गंधी पसरल्याने. त्याचा परिणाम म्हणून महामार्गावर सर्वत्र दुर्गंधी, घाणीचे साम्राज्य आणि आरोग्याचा धोका या ठिकाणाहून जात असलेल्या प्रवासी तसेच स्थानिक नागरीकांना होत असल्याने संतवाडी गावातील ग्रामस्थ तसेच काळजी झाड फाउंडेनशनचे पदाथिकारी यांच्या वतीने आळेफाटा येथील चौकात स्वातंत्र्य दिनी उपोषणास बसले होते.

या उपोषणाची दखल तहसीलदार शेळके यांनी घेत घटना स्थळीभेट दिल्यानंतर आठच दिवसांमध्ये प्रांताधिकारी यांच्याशी ग्रामस्थांसमवेत बैठक घेण्यात येईल असे सांगण्यात आले होते, त्यानंतर आंदोलकांनी उपोषण मागे घेतले. संबंधीत ग्रामपंचायत यांनी कचरा डेपो करीता जागा निश्चित करुन जागा मागणी प्रस्ताव गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेमार्फत या कार्यालयास सादर करावा. दरम्यान, आश्वसनानुसार प्रांताधिकारी गोविंद शिंदे यांनी तहसीलकार्यात संतवाडी, आळे, वडगाव आनंद येथील ग्रामस्थांसमवेत आयोजित केलेल्या बैठकीत बोलत होते.

या उपोषणाची दखल तहसीलदार शेळके यांनी घेत घटना स्थळीभेट दिल्यानंतर आठच दिवसांमध्ये प्रांताधिकारी यांच्याशी ग्रामस्थांसमवेत बैठक घेण्यात येईल असे सांगण्यात आले होते, त्यानंतर आंदोलकांनी उपोषण मागे घेतले. दरम्यान, आश्वसनानुसार प्रांताधिकारी गोविंद शिंदे यांनी तहसीलकार्यात संतवाडी, आळे, वडगाव आनंद येथील ग्रामस्थांसमवेत आयोजित केलेल्या बैठकीत बोलत होते.



### बैठकीमधील निर्णय

» तीनही ग्रामपंचायत/ग्रामसेवक यांनी असे कृत्य करणा-या व्यवसायीक आस्थापना/ संस्था/ व्यक्ती यां नोटीस देऊन आवशयक कार्यवाही करावी.

» संबधीत ग्रामपंचायतींनी हॉटेल व्यवसायीक यांना त्यांचेकडील कचरा तेथील परिसरात टाकू नये याबाबत लेखी नोटीस / सूचना द्या

» संबंधीत ग्रामपंचायत यांनी कचरा डेपो करीता जागा निश्चित करुन जागा मागणी प्रस्ताव गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेमार्फत या कार्यालयास सादर करावा.

» परिसरात टाकणेत येणाऱ्या जैव वैद्यकीय कच-यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असलेने तालुका आरोग्य अधिका-यांनी परिसरातील वैद्यकीय आस्थापणा यांची तपासणी करण्यात यावी.